**नियमित दिवाणी दावा क्रमांक ३४१/२०२२.**
**जावेद विरूध्द अब्दुल व इतर.**

## निशाणी क्रमांक १९ वर आदेश

मुळत: दिवाणी प्रकरण दाखल करून वादी हे प्रतिवादी विरुध्द जाहीर ठराव व मनाई हुकूमाच्या अनुतोषाची मागणी केली आहे. प्रस्तुत अर्जामध्ये दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ६ नियम १७ च्या अनुतोषाची तसेच दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका १ नियम १० च्या अनुतोषाची एकत्रित मागणी केलेली आहे. दावा प्रलंबित असताना तसेच न्यायालयाच्या मनाई हुकूमाच्या आदेशाचा भंग करीत प्रतिवादी क्र. २ यांनी प्रतिवादी क्र.३ यांच्या हक्कामध्ये नोंदणीकृत खरेदीखत करून दिले, प्रतिवादी क्र.४ ते ७ हे त्या खरेदीखतास मान्यता देणार.

(२) **मागणी केलेले विशोधन** :

सदरचे खरेदीखत वादीवर बंधनकारक नाही. ते रद्द व्हावे यांसह प्रतिवादी यांनी वादीच्या ताब्यास हरकत अडथळा करू नये.

यासह ज्यांच्या हक्कामध्ये खरेदीखत करून दिले त्यांना आवश्यक पक्षकार बनविण्याची परवानगी मिळावी.

(३) प्रतिवादी यांनी अर्ज मंजुरीस हरकत नोंदविली. त्यांचे मुख्य कथन की, मागणी केलेली दुरूस्ती ही मान्य केल्यास त्यामुळे दाव्याच्या मुळ स्वरूपामध्ये बदल होईल, आणखी गुंतागुंत तयार होईल. करिता खर्चासह अर्ज नामंजुर करावा.

(४) वादपत्रामध्ये काही दुरूस्ती करणे आणि गुणदोषावर न्यायानिर्णय झाल्यानंतर वाद मिळकती बाबत मागणी केल्याप्रमाणे अनुतोष मिळणे या दोन भिन्न बाबी आहेत. दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.३ यांच्या हक्कामध्ये नोंदणीकृत खरेदीखत करून दिल्याचे स्पष्ट दिसून येते. काही मजकुर वादपत्रामध्ये समाविष्ठ करण्याची परवानगी दिली म्हणजे वादीला वाद मिळकतीमध्ये मागणी केल्या प्रमाणे अनुतोष दिला ज्याव्दारे प्र.वादींचे खूप मोठे कधीही भरून न येणारे नुकसान झाले आहे, असे देखील कदीपीही होत नाही. आदेशीका ६ नियम १७ प्रमाणे सादर अर्ज मंजुर करतेवेळी प्रकरणाची स्टेज काय आहे, मागणी केलेली दुरूस्ती ही दावा प्रलंबीत असताना घडलेली बाब आहे काय, या बाबी देखील पहाणे जरूरी. आदेशीका ६ नियम १७ प्रमाणे दाखल अर्ज निकाली करतेवेळी गुणदोषावर उहापोह करण्याची आवश्यकता नाही. जर वादीने न्यायालयापासून काही महत्वाच्या बाबी हेतु

पुरस्सरपणे लपवून ठेवल्या असतील तर डिस्क्रीअेशन वापरून देण्याजोगा असेलेला अनुतोष देता वेळी न्यायालयाने काळजी घेतली पाहीजे असे न्यायतत्व. सर्व बाबींचा विचार करता या न्यायालयास असे दिसुन येत आहे की, मागणी केलेली दुरूस्ती :—

**१.** मुळ मागणीशी संबधीत आहे,
**२.** त्याव्दारे कायद्याचा मोठा प्रश्न देखील उपस्थित होत नाही,
**३.** दुरूस्तीसाठी वादीने लेखी अर्ज दाखल केलेला आहे,
**४.** नवे वादकारण घुसडण्याकरीता प्रस्तुतची दुरूस्ती करण्यात येत आहे असे देखील म्हणता येणार नाही,
**५.** प्रस्तावीत दुरूस्ती ही आदेशीका ६ नियम १६ या नियमात बसत आहे,
**६.** प्रस्तावित सुधारणेमुळे विरूध्द बाजुस अन्याय होत नाही,
**७.** दाव्यांतील खरे प्रश्न निकाली काढणे करीता मागणी केलेल्या दुरूस्तीची आवश्यकता आहे. करीता, सदरचा अर्ज मंजुर करणे आवश्यक आहे.

**(५)** करीता आदेशीका ६ नियम १६ प्रमाणे मागणी केलेले विशोधन मंजुर करण्यास या न्यायालयास आडकाठी दिसून येत नाही. परंतु, गुंडा तात्याबा जाधव विरूध्द संजय ध्यानचंद्र घोडावत, याचिका क्र.९४१०/२०१२ मध्ये ना.उच्च न्यायालय, मुंबई यांनी ठरविलेले मार्गदर्शक तत्व लक्षात घेतले. आदेशीका ६ नियम १६ मधील तरतुदींचा वापर करीत पक्षकारांना समाविष्ट करता येणार नाही. निश्चितच, आदेशीका १ नियम १० प्रमाणे स्वतंत्र अर्ज दिल्यानंतर तातडीने त्यावर आदेश पारीत केला जाईल. करिता तांत्रिक बाबींवर प्रस्तुतचा अर्ज अंशत: मंजुर. करिता आदेश:—

## <u>आदेश</u>

**१.** अर्ज नि.क्र.१९ हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका ६ नियम १७ च्या हद्दीपुरता मंजुर.

**२.** पुढील दिनांकापर्यंत दुरुस्ती करावी.

**३.** वादपत्राची सुधारीत प्रत संचिकेवर सादर करावी.

**४.** पक्षकारांना समाविष्ट करण्याकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशिका १ नियम १० प्रमाणे स्वतंत्र अर्ज दाखल करावा. त्याच दिवशी युक्तिवाद करावा. त्याच दिवशी अर्ज निकाली केला जाईल.

Digitally signed by GHULE GANESH AMBADAS
Date: 2024.07.04 16:46:33 +0530

(गणेश अं. घुले)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
इचलकरंजी, ता.हातकणंगले,
जि.कोल्हापुर.

दिनांक : ०४.०७.२०२४. जे.ओ.कोड : २५९४.